Reg. No: MH 813/2014/Pune

# SUMAN LOKSEVA SANSTHA

"Step up for Humanity"

Founder & President : Dr. Dnyaneshwar Mundlik

लोककल्याणाचा घेवूनी वसा हाती
घडवून आणणार आता एक अनोखीच क्रांती
घेवूनी साऱ्यांनाच सोबती संगती
करूया उज्वल अन् विकसीत ही माती

जिथे मिळेल आधार निराधाराला
नसे जिथे थारा भ्रष्टाचाराला
मिळेल जिथे ज्ञान व मान स्त्री जातीला
बसेल जिथून आळा बालमजुरीला

वृद्धांना जिथे घेता येईल मोकळा श्वास
युवा पिढीलाही मिळेल प्रेरणा खास
व्हावा फक्त अन् फक्त समाजाचाच विकास
एवढाच आता "सुमन लोकसेवा संस्थेचा" ध्यास!

- Educational Development
- Social Activities / Events
- Medical Help
- Sports Utilities
- Rural Development




- Environment Awareness
- Child Help
- Women Help
- Old Age Home / Care
- Human Rights

Reg. No: MH 813/2014/Pune

suman
Lokseva

# SUMAN LOKSEVA SANSTHA

"Step up for Humanity"

Founder & President : Dr. Dnyaneshwar Mundlik



अध्यक्षीय मनोगत,

प्रिय बंधु आणि भगिनी,

या पृथ्वीवर सर्व प्राण्यामध्ये हुशार ,दयाळ, प्रेमळ अशी जात म्हणजे “मनुष्य” जात होय. म्हणूनच ईश्वराने देखील जास्तीत जास्त वेळा मनुष्य जातीमध्येच अवतार घेतला आहे. आणि प्रेम व माणुसकीचे विविध धडे दिले आहेत. रामायण,महाभारत, कुराण, बायबल यासारखे विविध ग्रंथ देखील हेच शिकवतात. परंतु आपणास या गोष्टींचा विसर पडून आपण मनुष्य ही आपली मुळ जात आणि माणुसकी हा आपला मुळ धर्म विसरत चाललो आहोत. त्यामुळेच समाजामध्ये, सामाजिक आणि आर्थिक विषमता फोफावत चालली आहे. सगळीकडे असामाजिकता माजली आहे. आणि मदतीचा हात कोठेही दिसत नाही.

देशातील २०% लोक श्रीमंत ते अति श्रीमंत होत चालले आहेत आणि ८०% गरीब लोक अति गरीब होत चालले आहेत. एकीकडे २०% श्रीमंत लोक आयुष्यभर पैसा खर्च करून ऐश आराम करत आहेत तर एकीकडे ८०% गरीब लोक आयुष्यभर कष्ट करूनही आपल्या कुटुंबाला व्यवस्थित जगवू शकत नाही.व मुलांना व्यवस्थित शिक्षण देऊ शकत नाही,वडीलधा—यांचा औषधोपचार करू शकत नाही किंवा कुठली हौस करू शकत नाहीत. आता तर या महागाईमुळे स्वत:चे घर घेणेही एक स्वप्न बनले आहे.अशा दयनीय परीस्थितीमध्ये सर्व शांत बसले आहेत ही दु:खाची बाब आहे याचा सखोल विचार झाला पाहिजे . याचे मुळ कारण आहे, आपण मनुष्य ही आपली मुळ जात आणि माणुसकी हा आपला मुळ धर्म आपण विसरलो आहोत .कारण काही दुष्ट राजकीय शक्ती आपल्यामध्ये विविध जातींचे राजकारण करून आपल्याला या माणुसकीच्या एकजुटीतून बाहेर काढून या महागाईला आपला बळी देत आहे .

पुर्वी ज्यावेळी देश स्वतंत्र करताना हजारो शुरवीरांनी आपल्या देशासाठी प्राणांची आहुती आनंदाने दिली, त्यात हिंदू, मुस्लीम, शीख, ख्रिस्ती सर्व एक होते आणि त्यांनी एकीनेच देश स्वतंत्र केला .परंतु आता हिंदु जातीमध्ये पंधरा सोळा पोट जाती मुस्लीम, त्यात पोट जाती, सिख त्यात पोट जाती, इसाई त्यात पोटजाती असे तुकडे करून या मनुष्य जाती आणि या माणुसकी धर्माची वाट या दुष्ट शक्तींनी आपल्या हितासाठी विविध आरक्षणांचे अमीष दाखवून जातीय तेढ निर्माण करून लावलेली आाहे . त्यामुळे सामाजिक अस्थिरता निर्माण झाली. मोठया हुशारीने माणुस माणसाचा वैरी केला गेला आणि गरिबी व श्रीमंती यात विषमता निर्माण केली गेली, कारण आरक्षनाच्या आणि विविध प्रकारच्या अमिषाने माणुस आपल्या मुलाला तो कितीही हुशार असला तरी नोकरीस पाठवू लागला पण हे आरक्षण नसते तर आपल्या मुलाच्या हुशारीने चालाखीने तो कदाचीत एखादा लघुउदयोजक किंवा उदयोजक बनुन तो ही श्रीमंत होईल किंवा आपले नशिब आजमावेल आणि आर्थिक विषमता २०% श्रीमंत आणि ८०% गरीब ही परिस्थती बदलु शकला असता.

परंतु बुद्धीबळाच्या खेळाप्रमाणे आपल्या देशातील दुष्ट राजकीय शक्ती आपल्या एखादया प्यादयाप्रमाणे उपयोग करत आहेत. आपल्याला सरळ चौकटी निर्माण करून सरळ चालण्यास सांगून धर्माचे राजकारणात अडकवुन स्वत: वजीराप्रमाणे वाकडे—तिकडे चाल करून आपला या महागाईस गरीबीस बळी दिला जातोय .हे आपल्याला कळायला पाहिजे. आपण याचा सखोल अभ्यास केलाच पाहिजे. नाहीतर पुढे यापेक्षाही बिकट परीस्थितीस सामोरे जावे लागेल उदा. इरान, इराक देश,तिथेही असेच दुष्ट राजकीय शक्तीने जातीय तेढ निर्माण करण्यास खतपाणी घातलेले दिसते, आणि त्यामुळे आता तिथे परिस्थिती इतकी वाईट निर्माण झालेली आहे. लाखो निरागस मनुष्यांची कत्तल होतेय आणि आपण दु:ख शोक सभा घ्यायचे सोडुन त्यांचा परिणाम कुठे आपल्या शेअर मार्केटवर किंवा तेलाची किंमत एक दोन रूपयाने वाढली आणि त्यामुळे महागाई दर वाढून आपल्या कुटुंबावरील खर्चावर परिणाम होतोय का अशा गोष्टींवर विचार व चर्चा करताना दिसतो.

मित्रांनो आपल्याही देशाची वाटचाल त्याच दिशेने होतेय जर आपण आत्ताच काही केले नाहीतर आपलीही कत्तल झाली असेल या जाती धर्मामुळे

आपलाही देश याहीपेक्षा गंभीर परिस्थितीत असेल कारण त्या देशांपेक्षा आपल्याकडे जास्त धर्म जाती आहेत आणि आता त्यातही पोटजातीचे राजकारण वर डोके काढू पाहतेय. विविध योजणांद्वारे सरकारी यंत्रना या परिस्थितीवर मात करण्यास असमर्थ दिसते. आपण बालपणीची भारताची प्रतिज्ञा विसरलो आहोत आणि या २०%,८०% विषमतेवर मात करण्यास आपण ती प्रतिज्ञा आठवू या भारत माझा देश आहे आणि सारे भारतीय माझे बांधव आहेत. हे एक वाक्यच आपण व आमलात आचरणात आणले पाहिजे.

मी याच माणुसकीच्या धर्मासाठी मनुष्य जातीचे अस्तित्व टिकवण्यासाठी **"सुमन लोकसेवा संस्था"** या नावाने हे मिशन चालू केले आहे. या माझ्या, आपल्या मिशनमध्ये मोठया संख्येने सामील होवुन सशक्तपणे आपण एकजुटीने लढु आणि जिंकू कारण हे मिशन फार मोठे आाहे.सामाजिक, आर्थिक विषमतेवर मात आणि बदल घडवून आणण्यासाठी मला महराष्ट्रात कमीत कमी एक लाख शाखा आणि दहा लाख कार्यरत सभासदांची गरज आहे. कारण आपल्याला गाव, तालुका, जिल्हा, राज्य आणि देश अश्यापद्धतीने बदल घडविण्याचा आहे. आपले संघटन हीच आापली शक्ती आहे. जसे देश स्वातंत्र करताना नेताजी सुभाष चंद्र भोस यांनी नारा दिला “ तुम मुझे खुन दो मै तुम्हे आझादी दुंगा” तशाच पद्धतीने, मी तुम्हाला म्हणतो,“अब तुम मेरा साथ दो फिर तुम तुम्हेही खुशहाली देंगे”

## “*Step Up For Humanity*” and Join us.

जय हिंद, जय महाराष्ट्र
डॉ. ज्ञानेश्वर मुंडलिक (D.Hon.)
संस्थापक अध्यक्ष
सुमन लोकसेवा संस्था

## संस्थेचे उद्दिधष्ठे

* **शैक्षणिक विकासः**
- आदिवासी तसेच आर्थिक व सामाजिक मागास विद्यार्थ्यांसाठी आश्रमशाळा, आदिवासी शाळा, वसतिगृह व इतर शैक्षणिक संस्था चालविणे.
- अंध, अपंग, मतीमंद, नापास, शाळाबाहय यासारख्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक व व्यावसायिक प्रशिक्षण संस्था स्थापना करून त्यांना स्वावलंबी बनविणे.
- विद्यार्थ्यी समुपदेशन, बालसंगोपन केंद्र, संस्कार वर्ग निवासी बालसदन सुरू करणे.
- विद्यार्थ्यांचा व्यक्तीमत्व विकास तसेच व्यक्तीगत व व्यावसायिक कौशल्यात वाढ होण्यासाठी विविध उपक्रम राबवणे.

* **सांस्कृतिक :**
- विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून सार्वजनिक उत्सव व सांस्कृतिक महोत्सवांचे आयोजन करणे.

* **आरोग्य :**
- मातामृत्यु, बालमृत्यु व कुपोषणास प्रतिबंध करण्यासाठी पोषक व पुरक आहार, आरोग्य व इतर सोई–सुविधा पुरविणे.
- रूग्णवाहिका, रक्तपेढी, अदयावत सुसज्ज व सर्व सोई–सुविधांनी उपयुक्त असे मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, मेडीकल यासारख्या सुविधा पुरविणे.
- सार्वजनिक ग्रामस्वच्छतेचे कार्यक्रम हाती घेणे.
- नेत्रदान, रक्तदान, किडणीदान, देहदान अशा कार्यक्रमांबद्दल जनजागृती करणे व प्रोत्साहन देणे. जनतेच्या सुदृढ आरोग्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करणे.

* **क्रिडा :**
- अदयावत, सुसज्ज व सर्व सोईसुविधांनी उपलब्ध व्यायाम शाळा, जलतरण तलाव, क्रिडा प्रशिक्षण यासारख्या यंत्रणांची उभारणी करणे व त्यामध्ये विशेषत: सामाजिक, आर्थिक मागास घटकांना या सुविधा उपलब्ध करूण देणे.
- विविध पातळयांवरील क्रिडा स्पर्धेचे आयोजन करणे व पारितोषिक वितरण करणे.

* **युवक :**
- संगणक ज्ञान, माहिती तंत्रज्ञानाचा प्रचार व प्रसारासाठी विविध उपक्रम व कार्यक्रम राबवणे.
- महासेवा केंद्राची उभारणी करून युवकांना रोजगार निर्मिती करणे.
- युवक व युवतींना संघटीत करून त्यांच्या माध्यमाातून व श्रमदानातून विविध कार्यक्रम राबवणे.

* **पर्यावरण :**
- वृक्ष संवर्धन वनीकरण यांसारख्या विविध कार्यक्रमांचे आयोजन करणे.
- पर्यायी/जैविक इंधन निर्मितीचे उपक्रम सुरू करणे. तसेच जैव इंधन उत्पादन करणा–या वृक्षांची लागवड करून इंधन निर्मितीच्या माध्यमातून रोजगार निर्माण करणे.
- मानव, पशुपक्षी व वन्यपक्षी यासारख्या सजीवांकरीता अनुकुल पर्यावरण निर्मिती करणे.
- जलसाक्षरता व जलव्यवस्थापन यासारख्या विविध उपक्रम व कार्यक्रमांचे आयोजन करणे.
- जागतिक तापमानवाढ यासारख्या विषयांवर विविध प्रकल्प हाती घेवुन जाणीव जागृती व उपाययोजना करणे.

* **महिला व बाल विकास विषयक :**
- निराधार, विधवा, कुमारीमाता, परित्यक्ता यांसारख्या महिलांकरिता विशेष कार्यक्रमांची आखणी व अंमलबजावणी करणे.
- महिलाश्रम, महिला विद्यालय,महाविद्यालय, वसतीगृहे यांसाारख्या यंत्रणांची उभारणी करणे.
- महिलांच्या विविध समस्या (उदा. सामाजिक, आर्थिक, आरोग्य, कौटुंबिक, लैगिंक व पोषक आहार) सोडविण्याच्या दृष्टीने समुपदेशन व मार्गदर्शन केंद्र यासारख्या यंत्रणा उभारणे.
- स्वयं सहाय्यता व बचत गट यांची क्षमता बांधणी, सक्षमीकरणासाठी प्रशिक्षण व मार्गदर्शन देणे.

* **जेष्ठ नागरिक :**
- निराधार जेष्ठ नाागरिकांसाठी वृध्दाश्रम, खानावळी, अल्पोपहार केंद्र यासारख्या यंत्रणा उभारणे.
  जेष्ठ नाागरिक मंच, सहली, करमणूक केंद्र, प्रौढ निरंतर शिक्षण यासारख्या सोई–सुविधा पुरविणे.

* **इतर :**
- विविध क्षेत्रात उल्लेखणीय कामगिरी करणा–यांना पुरस्कार देणे.
- समाजविघातक कृतींपासून परावृत्त करण्यासाठी जाणीव जागृतीचे कार्यक्रम घेणे.
- आर्थिक, सामाजिक, मागास, वंचित व्यक्ती व समुहाच्या हक्क, अधिकार व प्रगतीसाठी विधायक कार्य करणे.
- लोकांमध्ये समाजप्रबोधन, जाणीव जागृती होण्यासाठी आवश्यक ती माहिती त्यांच्या पर्यंत पोहचण्यासाठी विविध विषयांवर माहितीपट व चित्रपटांची निर्मिती करणे.
- मानसिक, शारिरीक, सामाजिक, विकलांग, भिक्षुक, व्यसनी, रोगी व महारोगी यांसारख्या व्यक्तिकरिता सहाय्य, शिक्षण, प्रशिक्षण, मार्गदर्शन, हक्काविषयक बाबी, सुधारगृह व पुनर्वसन यांसारख्या घटकांमध्ये सक्रीय कार्य करणे.
- सामुदायिक, आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन देणे व वधुवर सुचक कार्यक्रम, विवाह सोहळा यांसारख्या कार्यक्रमांचे आयोजन करणे व अश्या कार्यक्रमांना चालना देणे.

suman
Lokseva

SUMAN LOKSEVA SANSTHA
"Step up for Humanity"
Founder & President : Dr. Dnyaneshwar Mundlik

# प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरूजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यातच माझे सौख्य सामावले आहे.







HEAD OFFICE : P.S. ANGAN, OFFICE NO.11 MAGARPATTA ROAD, HADAPSAR, PUNE - 411 028 (MH)
•Tel.(0 ) : 020-6500 8184/85/86 •E-mail :info@sumanlokseva.org
• Web: www.sumanlokseva.org •